स्वग्राम आणि रजा प्रवास सवलत

महाराष्ट्र शासन ,
वित्त विभाग,
शासन निर्णय , क्रमांक: संकीर्ण- १०००/प्र.क्र.७०/ सेवा-५,
मंत्रालय , मुंबई - ४०० ०३२ , दिनांक :- ११ ऑगस्ट ,२०००.

पहा:- शासन निर्णय , वित्त विभाग, क्र. : टीआरअे.- ११६३/२७२६/५, दि. २३ ऑक्टो.१९६३
शासन निर्णय , वित्त विभाग, क्र. : टीआरअे. -११८०/सीआर-३१८/एसईआर-५.
दिनांक ९ सप्टे. १९८०,
शासन निर्णय , वित्त विभाग, क्र. : रप्रस - ११९४/१८४/सेवा-५ दि. २८ मार्च,१९९५.

शासन निर्णय

महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या **क्र. लोसंधो-२०००/प्र.क्र.५७/००/कु.क. १, दिनांक ९.५.२०००** च्या शासन निर्णयाद्वारे राज्य लोकसंख्या धोरण जाहीर केले आहे. सदर धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीकरिता शासनाने " छोटे कुटुंब " या संकल्पनेचा स्विकार केला आहे. या धोरणानुसार स्वग्राम आणि रजा,प्रवास सवलत या प्रयोजनासाठी कुटुंब या संज्ञेची व्याख्या बदलण्याचा / सुधारण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता यावर असा निर्णय घेतला आहे की, स्वग्राम प्रवास सवलत / रजा प्रवास सवलत या प्रयोजनासाठी कुटुंब या संज्ञेची व्याख्या यापुढे खालीलप्रमाणे असेल:-

कुटुंब :- पती / पत्नी व २ हयात अपत्ये यांचे मर्यादित कुटुंब यांनाच या सवलतीचा फायदा मिळेल. ज्या कर्मचा-यांस दोन पेक्षा ज्यास्त अपत्ये (जिवंत) असतील त्या कर्मचा-यास वा त्यांच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यांना ही सवलत अनुज्ञेय राहणार नाही .

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: टीआरअे- ११६३/२७२६/५, दिनांक २३ ऑक्टो. १९६३ व त्यानंतर हया संदर्भात निर्गमित करण्यांत आलेल्या सर्व तरतूदी (इतर अटी व शर्ती) आवश्यक त्या फेरफारासह लागू राहतील.

हे आदेश दिंनाक १ सप्टेंबर २००० पासून अंमलात येतील .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श. वि. लागवणकर
सह सचिव ,वित्त विभाग.

प्रति,

महालेखापाल - १ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र , नागपूर
महालेखापाल -१ (लेखापरीक्षा) , महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल -२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई

(कृ. मा. प.

एच-824(19980+20-8-00)

राज्यपालाचे सचिव
मुख्यमंत्र्याचे सचिव
उपमुंख्यमंत्र्याचे सचिव
सर्व मंत्री आणि राज्य मंत्री यांचे स्वीय सहाय्यक
मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व विभागीय आयुक्त
मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय,(व्यय विभाग) खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई
उप मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब ,मुंबई /पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय मुंबई
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग सेवा-५.
